वर्ष दुसरे



भविष्यवेधी नेतृत्व
**मा. उदय सामंत**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री,
महाराष्ट्र राज्य

# महाराष्ट्र राज्य
# उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....

## आयएएस आपल्या भेटीला

- राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/ महाराष्ट्र लोकसेवा आयोग
- पोलीस भरती
- बँकिंग सेवा
- स्टाफ सिलेक्शन कमिशन
- केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु पी एस सी)

## उद्योजक आपल्या भेटीला

- उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
- व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन
- वित्त व्यवस्थापन
- निर्णय क्षमता
- जोखीम व्यवस्थापन (Risk Management)
- मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन
- आधुनिक तंत्रज्ञान

ध्येयपूर्तीच्या वाटेवर सातत्याने ३६५ दिवस

यासोबत सभासद शुल्क ₹ ३६५/-भरल्यानंतर विद्यार्थ्यांना ०३ वर्ष प्रति वर्ष ०५ या पद्धतीने १५ कोर्स मोफत दिले जातील.

Subscribe me

**नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी**
**7507652555 या नंबरवर आपले नाव करा**
https://careerkatta.mitsc.co.in

SCAN ME

| Course List | |
|---|---|
| 1) Python Programming | 26) Digital Banking |
| 2) Python for AI/ML | 27) Digital Marketing |
| 3) Python for web Development | 28) Political Ethics and Value |
| 4) Cloud computing | 29) Leadership Development |
| 5) Devops | 30) Literacy about Judicial Process |
| 6) Data analytics with tableau and power BI | 31) Constitutional Values and Ethics |
| 7) Social Media Profile Management | 32) Certificate in Office Administration |
| 8) Financial Literacy | 33) Certificate in Training Management |
| 9) Event Management | 34) Organic Farming |
| 10) Fund Flow Management | 35) Fruits and Vegetables Drying Dehydration and Technology |
| 11) Communication Skill & Personality Development | 36) Certificate course in World Politics |
| 12)बी पी टी १९५० संस्था नोंदणी कायदा प्रशिक्षण | 37) Certificate course in Rural Development |
| 13) Road Safety and Awareness Training | 38) Scientific Temperament |
| 14) परदेशी नोकरीच्या संधी आणि व्यक्तिमत्व विकास | 39) Green Chemistry |
| 15) Foundation Course in Business Law | 40) Renewable Energy |
| 16) माहिती अधिकार कायदा प्रशिक्षण | 41) Nanotechnology |
| 17) Soft Skill Training Program | 42) Biotechnology |
| 18) Certificate Course in Human Right | 43) Medical Lab Technology |
| 19) Certificate Course in Journalism | 44) Nano Biotechnology |
| 20) Communication Skill Program | 45) Introduction to Forensic Science |
| 21) Content Writing Course | 46) Tourism Management |
| 22) Basic of Cost & Works Accounting | 47) Forensic Accounting |
| 23) E- Filling | 48) Cyber Law |
| 24) Soft Skill Development | 49) Office Management |
| 25) Introduction to Basic Concept of Accounting | 50) Consumer Protection Act 2019 |

# करिअर कट्टा विद्यार्थी नोंदणी फॉर्म

1) नाव :- ..............................................................................

2) शिक्षण :- ..................................

3) ई-मेल आयडी :-......................................................................

4) मोबाईल नंबर :

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

5) महाविद्यालयाचे नाव :- ...............................................................

......................................................................................... .

6) महाविद्यालयाचा कोड :- ....................................

7) करिअर कट्टा कोर्सचे नाव :-

- IAS आपल्या भेटीला ☐
- उद्योजक आपल्या भेटीला ☐

8) जिल्हा :- ...................................

9) तालुका :- .............................

10) विद्यार्थ्यांची सही :- ..................................

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य
# उच्च व तंत्र शिक्षण विभाग
# व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....

# महाविद्यालयासाठी माहिती पुस्तिका




MAHARASHTRA INFORMATION TECHNOLOGY SUPPORT CENTER

web : www.mitsc.co.in E mail : careerkatta365@gmail.com .: 7507652555

वर्ष दुसरे



भविष्यवेधी नेतृत्व
**मा. उदय सामंत**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री,
महाराष्ट्र राज्य

## महाराष्ट्र राज्य
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....

### आयएएस आपल्या भेटीला

* राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/महाराष्ट्र लोकसेवा आयोग
* पोलीस भरती
* बँकिंग सेवा
* स्टाफ सिलेक्शन कमिशन
* केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु.पी.एस.सी.)

### उद्योजक आपल्या भेटीला

* उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
* व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन
* वित्त व्यवस्थापन
* निर्णय क्षमता
* जोखीम व्यवस्थापन (Risk Management)
* मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन
* आधुनिक तंत्रज्ञान

ध्येयपूर्तीच्या वाटेवर सातत्याने ३६५ दिवस

Subscribe me

नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी
7507652555 या नंबरवर आपले नाव करा
https://careerkatta.mitsc.co.in

SCAN ME



भविष्यवेधी नेतृत्व

**मा. उदय सामंत**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री,
महाराष्ट्र राज्य

**उदय सामंत**

**मंत्री**
**उच्च व तंत्र शिक्षण**
**महाराष्ट्र राज्य**

१५/०२/२०२२

**शुभेच्छा संदेश**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती-तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू करण्यात आलेल्या "करिअर कट्टा" उपक्रम महाराष्ट्रातील युवकांमध्ये अतिशय विद्यार्थीप्रिय होत आहे. या उपक्रमाच्या वर्धापन दिनानिमित्त "करिअर कट्टा" विषयी सविस्तर माहिती देणारी माहिती पुस्तिका प्रकाशित करण्याचा विचार अतिशय स्तुत्य आहे.

महाराष्ट्रातील उच्च व तंत्र शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा बरोबरच उद्योजकीय विकासासाठी देखील "करिअर कट्टा" मार्फत मार्गदर्शन दिले जाते. त्याचबरोबर कौशल्य विकास व इनक्युबेशन सेंटर च्या माध्यमातून सातत्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. "करिअर कट्टा" उपक्रमांतर्गत मी अपेक्षा व्यक्त केल्याप्रमाणे पुढील युवा दिनापर्यंत महाराष्ट्रातील १ लाख विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषण कौशल्य शिकवण्याचा संकल्प आपण केलेला आहे. या सर्व उपक्रमासाठी मन:पूर्वक सदिच्छा!

(उदय सामंत)

**प्रति,**
**श्री.यशवंत शितोळे,**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र**

**कार्यालय** : दालन क्र. ५०१, पाचवा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. ✆ ०२२-२२०२२१०० / २२०२३९९२
**निवास** : ब-२, बंगला, मॅडम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२. ✆ ०२२-२२०२४५७० / २२०२५३११
**ई-मेल** : ministerudaysamant@gmail.com / udaysamant.minister@nic.in @samant_uday
@udayravindrasamant @uday.samant



**मा. डॉ. धनराज माने**
संचालक,उच्च शिक्षण, पुणे

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१२११५३.

क्र.: विदयार्थी/२११९/प्र.क्र.२७//मवि-१. 2105 दिनांक: १८.०२.२०२१.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण.महाराष्ट्र .
२. कुलसचिव, सर्व अकृषी./अभिमत/ स्वयं अर्थसाहीत विदयापीठे/ महाराष्ट्र राज्य.

**विषय: महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागामध्ये शिकणा-या लाखो विदयार्थ्यांसाठी IAS आपल्या भेटीला हा उपक्रम राबविणेबाबत.**

**संदर्भ:** अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञानं सहायता केंद्र यांनी मा..मंत्री ,उच्च व तंत्रशिक्षण,विभाग,मंबई. यांना लिहीलेले पत्र क्र. मंत्री/उ व तं.शि/व्ही.आय.पी /१०८/२०२१, दिनांक-९/२/२०२१.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

संदर्भीय पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि भारतीय प्रशासकीय सेवेच्या वेगवेगळया स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणा-या विदयार्थ्यांसाठी पुणे, दिल्ली याठिकाणी वेगवेगळया सुविधा व मान्यवरांचे मार्गदर्शन उपलब्ध असल्यामुळे ग्रामीण भागातून युवक शहरी भागात येत आहेत. ते थांबविण्यासाठी, तसेच स्पर्धा परीक्षेसाठी करावा लागणारा खर्च सर्वसामान्यांना परवडेल यासाठी, IAS आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत संपूर्ण भारतामध्ये कार्यरत असणा-या प्रशासकीय अधिका-यांचे वेगवेगळे अनुभव लोकांना प्रेरणा व प्रोत्साहन तर देतीलच पण त्याचबरोबर युवकांचा प्रशासकीय सेवेमध्ये येण्याचा दृष्टीकोन बदलण्यामध्ये मदत होईल, असे नमूद केलेले असून IAS आपल्या भेटीला हा उपक्रम विदयार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याकरीता सहकार्याची विनंती करण्यात आलेली आहे.

तरी सदर उपक्रम आयोजित करणेबाबत आपल्या अधिनस्त तसेच शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये यांना आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात व त्याबाबत अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.धनराज माने.)
शिक्षण संचालक,उच्च शिक्षण.
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रत-

१. स्वीय सहायक, मा.मंत्री,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तारभवन,मुंबई.४०० ०३२.
२. मा.प्रधान सचिव, ,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तारभवन,मुंबई-४०० ०३२.
३. अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र.



**मा. अभय वाघ**
संचालक, तंत्रशिक्षण,मुंबई

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९४४१९
ई-मेल-desk19@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १९/तंशिसं/क्वॉसे/२०२१/१२ दिनांक : 12 FEB 2021

प्रति,
**सहसंचालक**
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

**विषय : महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांसाठी "IAS आपल्या भेटीला आणि उद्योजक आपल्या भेटीला" हा उपक्रम राबविणेबाबत...**

**संदर्भ** : १) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. मंत्री/उवतंशि/व्हीआयपी/१०८/२०२१, दि. ०८-०२-२०२१
२) तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २३/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/२०२०/३५५, दिनांक ११ डिसेंबर, २०२०

तंत्र शिक्षण विभागातून राज्यातील दरवर्षी लाखोच्या संख्येने पदवीधर होऊन बाहेर पडणाऱ्या **युवकांना कौशल्याभिमुख व उद्योजकीय ज्ञानाने परिपूर्ण असे ज्ञान देणे आवश्यक आहे.** COVID- १९ ही जगावर आलेली एक आपत्ती जरी असली तरी भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये पर्यायाने महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेमध्ये एक मोठा सकारात्मक बदल झाला तो म्हणजे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण व्यवस्था आणि प्रशासन हे तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणामध्ये करत ऑनलाइन शिक्षण-प्रशिक्षणाचा मार्ग अवलंबत आहेत, आता याच धर्तीवर महाराष्ट्रातील उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये शिकणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रामार्फत खालील दोन अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**१. IAS आपल्या भेटीला**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग आणि भारतीय प्रशासकीय सेवेच्या वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुणे, दिल्ली याठिकाणी वेगवेगळ्या सुविधा व मान्यवरांचे मार्गदर्शन उपलब्ध असल्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये ग्रामीण भागातून युवक शहरी भागामध्ये येतो. तो थांबवणे त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेसाठी करावा लागणारा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्यात यावा, यासाठी IAS आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत दिल्ली, मुंबई अथवा संपूर्ण भारतामध्ये कार्यरत असणारे प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन दररोज एक याप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देता येईल. प्रत्यक्ष कार्यरत असणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वेगवेगळे अनुभव लोकांना प्रेरणा व प्रोत्साहन तर देतीलच पण त्याचबरोबर युवकांचा प्रशासकीय सेवेमध्ये येण्याचा दृष्टिकोन बदलण्यामध्ये देखील मदत होईल.

**२. उद्योजक आपल्या भेटीला**

उद्योजकीय कौशल्य वाढीसाठी - उद्योजक आपल्या भेटीला हा उपक्रम महाविद्यालयीन युवक ज्यांना स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करावयाचा आहे, त्यांचे उद्योजकीय कौशल्य वाढीस लागण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चालू असणाऱ्या वेगवेगळ्या संकल्पनांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या दृष्टिकोनातून

"उद्योजक आपल्या भेटीला" हा उपक्रम राज्यभरामध्ये राबविण्यात येत आहे. महाविद्यालयातून दरवर्षी बाहेर पडणाऱ्या लाखो पदवीधरांमधून अनेक आयएएस, आयपीएस आणि उद्योजक घडवण्यासाठी हा उपक्रम निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल आणि देशाच्या विकासासाठी हातभार लागेल.

याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, सदरचे उपक्रम राबविण्याकरीता आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना कळविण्यांत यावे. तसेच संचालनालयाच्या संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक ११ डिसेंबर, २०२० च्या पत्रान्वये संस्थेत कार्यरत असलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्वयकांकडून सदरचे उपक्रम राबविण्याबाबत सर्व संस्थांना सूचित करण्यांत यावे.

त्याचप्रमाणे सदर उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थां यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी आपल्या कार्यालयात एका समन्वयकाची नियुक्ती करावी व त्यांचे मार्फत संस्था स्तरावरील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्वयकांची माहिती आपल्या स्तरावर संकलित करुन ती खालील तक्त्यामध्ये भरुन careerkatta365@gmail.com या-मेल आयडीवर दिनांक १६-२-२०२१ पूर्वी पाठविण्याची कार्यवाही करावी. तसेच त्याची प्रत desk19@dtemaharashtra.gov.in या-मेल आयडीवर सादर करावी.

| विभागीय कार्यालयाचे नांव : | | |
|---|---|---|
| समन्वयकाचे नांव | मोबाईल क्रमांक | ई-मेल आयडी |
| | | |

| महाविद्यालयाचे नांव : | | | | |
|---|---|---|---|---|
| उपक्रम | समन्वयकाचे नांव | मोबाईल क्रमांक | व्हाट्स अप क्रमांक | ई-मेल आयडी |
| IAS आपल्या भेटीला | | | | |
| उद्योजक आपल्या भेटीला | | | | |

सदर उपक्रमाची संकल्पना, उद्दिष्ट्ये, कार्यपध्दती, नोंदणी, व्यवस्थापकीय रचना इत्यादीबाबतची तपशीलवार माहिती सोबत जोडली आहे. सदरच्या माहितीचे अवलोकन करावे. त्याचप्रमाणे सदरच्या उपक्रमांची माहिती संस्थेच्या नोटीस बोर्ड व व्हॉटसअप मेसेजच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याबाबतही संस्थांना कळविण्यांत यावे. संस्थांमधील समन्वयकांना विद्यार्थ्यांची नोंदणी करताना किंवा प्रत्यक्ष योजना राबविण्याबाबत काही शंका असल्यास अथवा अधिक माहितीसाठी 7507652555 या क्रमांकावर संपर्क साधावा.

**सोबत :** उपक्रमाचे तपशीलवार सादरीकरण (नोंदणी करीता आवश्यक असणाऱ्या लिंकसह)

# संकल्पना




**मा. यशवंत शितोळे**
अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी हा केंद्रबिंदू नजरेसमोर ठेवून आकारास येत असलेला एक महत्त्वकांशी उपक्रम म्हणजे ''करिअर कट्टा''. महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री सन्माननीय उदयजी सामंत यांच्या दूरदृष्टीतून अनेक महत्वपूर्ण बदल उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये होत असल्याचे आपण पाहत आहोत. कोरोनाच्या महामारी नंतर आपण सर्वजण पून्हा एकदा स्वत:ला जागतिक स्पर्धेमध्ये सिद्ध करण्यासाठी तयार करीत आहोत. हे करीत असताना उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थांना समान पातळीवर मार्गदर्शनाची संधी उपलब्ध व्हावी, या विचाराने करिअर कट्टा कार्यरत आहे. या उपक्रमांमध्ये प्रशासकीय अधिकारी, यशस्वी उद्योजक त्याचबरोबर विविध तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जात आहे. नोकरी मागणाऱ्या हातांपेक्षा नोकरी निर्माण करणारे हात लोकांच्या समोर यावेत या उद्देशाने राज्य शासन व केंद्र शासनाच्या धोरणानूसार प्रत्येक महाविद्यालयांमध्ये इंक्युबेशन सेंटर असावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याचबरोबर प्रत्येक महाविद्यालयांमध्ये एक मॉडेल कौशल्य विकास केंद्र असावे यासाठी देखील या उपक्रमांतर्गत प्रयत्न केले जात आहेत. शिक्षकांसाठी आवाजाची कार्यशाळा हा देखील एक अभिनव उपक्रम याअंतर्गत राबवला जात आहे. आपल्या महाविद्यालयात इंक्युबेशन सेंटर, वेगवेगळे सामंजस्य करार, रोजगार मेळावे, स्किल डेव्हलपमेंट सेंटर आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन या अनेक उपक्रमांच्या माध्यमातून नॅक मूल्यांकनामध्ये देखील मदत होईल अशी रचना या उपक्रमाची करण्यात आली आहे. ग्रामीण आणि शहरी हा भेद कमी व्हावा आणि केवळ भौगोलिक मर्यादा किवा आर्थिक क्षमतांची कमतरता या कारणांमुळे कष्ट करण्याची तयारी असणारे होतकरू व गुणवंत विद्यार्थी चांगल्या रोजगाराच्या, व्यवसायाच्या आणि नोकरीच्या संधी पासून वंचित राहू नयेत, यासाठी चाललेला हा प्रयत्न यशस्वी होण्यासाठी राज्यातील विविध विभागाचे शिक्षण सहसंचालक, प्राचार्य व समन्वयक अतिशय महत्वाचे आहेत. आपल्या सहकार्याने हा उपक्रम जास्तीत जास्त विस्तारत आहे.

आणि हे करीत असताना महाराष्ट्र राज्याच्या तंत्र शिक्षण संचालक व उच्च शिक्षण संचालक यांनी देखील अतिशय महत्वाचे मार्गदर्शन व योगदान दिलेले आहे. हा उपक्रम जास्तीत जास्त परिपूर्ण व्हावा यासाठी प्रयत्न करीत असतात. सहकार्य करणारे महाविद्यालय समन्वयक, जिल्हा समन्वयक, विभागीय समन्वयक व तज्ञ मार्गदर्शक, ज्ञात अज्ञात सर्व हितचिंतक या सर्वांचे मन:पूर्वक आभार. हा उपक्रम जास्तीत जास्त निर्दोष व्हावा, प्रभावी व्हावा यासाठी आपले अभिप्राय, सूचना निश्चित कळवाव्यात.

या उपक्रमावरील आपले प्रेम उत्तरोत्तर वृद्धींगत होत राहो हीच प्रार्थना.

**मा. यशवंत शितोळे**
अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र



**डॉ. सचिन नांद्रे**

(करिअर कट्टा विभागीय समन्वयक, कबचौउमवि जळगाव,
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना कबचौउमवि, जळगाव)

# संपादकीय

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून करिअर कट्टा महाविद्यालयीन युवकांसाठी फार उपयुक्त आणि महत्वाचा घटक असून यात विद्यार्थांनी, जर लक्ष देवून अभ्यासक्रम व करिअर कट्टा हे दोन्ही घटक व्यवस्थितरित्या समजून घेतले तर ते पदवी परीक्षा उत्तीर्ण होताना त्यांच्याकडे नोकरी हातात असेल हे ध्येय ठेवून हा करिअर कट्टा झपाटून काम करीत आहे. आपले महाराष्ट्र राज्य मागे राहणार नाही. यासाठी आपण सर्वांनी जर प्रयत्न केले तर लवकरच युवकांना योग्य अशा मार्गदर्शनमुळे योग्य काम, योग्य संधी मिळणार आहे. 'लक्ष एकच, ध्यास एकच, फक्त आणि फक्त करिअर कट्टा'.

यामाध्यमातून सर्व विद्यार्थ्यांचा विकास होऊन विविध पदावर अधिकारी, किंवा कौशल्य आत्मसात करून स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकतील अशी ताकद निर्माण करण्याची क्षमता करिअर कट्ट्यामध्ये आहे. तसेच ही माहिती पुस्तिका तयार करताना मला, कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सर्व जिल्हा समन्वयक, महाविद्यालयीन समन्वयक या सर्वांची मोलाची मदत मिळाली म्हणून मी हे काम करू शकलो.

'एकच ध्यास करिअर कट्ट्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास'

आपला

**डॉ. सचिन नांद्रे**

(करिअर कट्टा विभागीय समन्वयक, कबचौउमवि जळगाव,
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना कबचौउमवि, जळगाव)



**डॉ. राणी शितोळे**
(पुणे जिल्हा शहर समन्वयक, करिअर कट्टा)

# संपादकीय

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा उपक्रमाच्या माहिती पुस्तिकेचे काम करण्याची मला संधी दिल्याबद्दल मी मा. यशवंत शितोळे (अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र) यांचे आभार मानते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतलेले मा. उदयजी सामंत (कॅबिनेट मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांनी अतिशय स्तुत्य उपक्रमास नेहमीच मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले आहे. करिअर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांना आपलासा वाटत आहे. विद्यार्थ्यांच्या करिअर संबंधी चर्चा करण्यासाठी अधिकृत असा करिअर कट्टा उपलब्ध झाला आहे. या उपक्रमांमध्ये संविधानाचे पारायण, वृत्तवेध स्पर्धा परीक्षेचा, सायबर सिक्युरिटी, आय.ए.एस. आपल्या भेटीला, उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमास अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे.

करिअर कट्ट्याची महाविद्यालयासाठीची माहिती पुस्तिका ही प्रत्येक महाविद्यालयीन प्राचार्य, महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक, विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयक यांना मार्गदर्शसाठी अतिशय उपयुक्त होणार आहे. यामुळे उपक्रम समजण्यास मदत मिळणार आहे. प्राचार्यांना, समन्वयकांना व विद्यार्थ्यांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे नक्कीच यामध्ये मिळतील. तरीसुद्धा या माहिती पुस्तकात काही उणिवा, चुका असल्यास त्या देखील आपण आम्हास सुचवाव्यात ही नम्र विनंती. महाविद्यालयासाठी माहिती पुस्तिका तयार करताना विभागीय, जिल्हा, महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक तसेच एम.आय.टी.एस.सी. कार्यालयीन कर्मचारी यांनी देखील मोलाचे सहकार्य केले आहे. त्याबद्दल त्यांचे शतश: आभार मानते.

**डॉ. राणी शितोळे**
(पुणे जिल्हा शहर समन्वयक, करिअर कट्टा)

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १. | **शुभेच्छा संदेश**<br>मा. उदयजी सामंत (मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य) | १ |
| २ | **शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पत्र** | २ |
| ३ | **तंत्र संचालनालय पत्र** | ३ |
| ४. | **संकल्पना** | ५ |
| ५. | **संपादकीय – डॉ. सचिन नांद्रे** | ६ |
| | **संपादकीय – डॉ. राणी शितोळे** | ७ |
| ६. | **करिअर कट्ट्याचे विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम** | |
| | आय.ए.एस. आपल्या भेटीला | ९ |
| | उद्योजक आपल्या भेटीला | १० |
| | कौशल्य प्रशिक्षण उपक्रम | १२ |
| | युवा दिन | १५ |
| | आवाजाची कार्यशाळा | १६ |
| ७. | **महाविद्यालयसाठीचे उपक्रम** | |
| | मॉडेल कौशल्य विकास केंद्र | १८ |
| | इंक्युबेशन सेंटर | १९ |
| | सामंजस्य करार | २० |
| | रोजगार मेळावे | २० |
| ८. | **'करिअर कट्टा' पदाधिकारी कार्यपद्धती** | |
| | महाविद्यालयीन समन्वयक | २१ |
| | महाविद्यालयीन प्राचार्यांची भूमिका व जबाबदारी | २२ |
| | करिअर कट्टा जिल्हा समन्वयक | २२ |
| | करिअर कट्टा विभागीय समन्वयक | २३ |

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| ९. | **नोंदणी प्रक्रिया** | |
| | महाविद्यालयासाठी नोंदणी प्रक्रिया | २४ |
| | विद्यार्थ्यांसाठी नोंदणी प्रक्रिया | २४ |
| १०. | **बैठक नियोजन** | |
| | राज्यस्तरीय सर्व समन्वयकांची बैठक | |
| | सर्व जिल्हा समन्वयक यांची राज्यस्तरीय बैठक | २५ |
| | महाविद्यालयीन समन्वयकांची जिल्हास्तरीय बैठक | २५ |
| | महाविद्यालयीन समन्वयकांची विभागीय बैठक | २६ |
| | प्राचार्यांची बैठक | २६ |
| | वार्षिक उपक्रमांची दिनदर्शिका | २६ |
| ११ | **दैनंदिन उपक्रम** | २६ |
| | भारतीय संविधानाचे पारायण | २७ |
| | वृत्तवेध स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी | २७ |
| | लोकशाही निवडणूका आणि प्रशासन | २७ |
| १२. | **महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा** | २८ |
| १३. | **आवश्यक नमुने** | |
| | समन्वयक नियुक्ती पत्राचा नमुना | २९ |
| | समन्वयक बदल पत्राचा नमुना | ३० |
| | महाविद्यालयीन विद्यार्थी ब्रँड अँबेसिडर नियुक्तीचा नमुना | ३१ |
| | महाविद्यालयीन फलक | ३२ |
| १४. | **करिअर कट्टा विभागीय समन्वयक यादी** | ३३ |
| १५ | **करिअर कट्टा जिल्हा समन्वयक यादी** | ३४ |

## १. आय.ए.एस.आपल्या भेटीला

केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याद्वारे घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांची माहिती महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत उपलब्ध होणे आवश्यक आहे.स्पर्धा परीक्षेसाठी शहरी भागात खूप मोठ्या प्रमाणात चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध असतात. परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येत नाही. कारण त्याचे शुल्क अधिक असते. ते त्यांच्या आवाक्याबाहेरचे असते. प्रशासकीय अधिकारी बनण्याची स्वप्ने पाहणाऱ्या या विद्यार्थ्यांची स्वप्ने प्रत्यक्षात यावीत. यासाठी महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ''करिअर कट्टा'' या उपक्रमांतर्गत आयएएस आपल्या भेटीला या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना भारतामध्ये कार्यरत असणाऱ्या अनुभवी व तज्ञ अशा प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन दररोज एक याप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा नक्की चांगला फायदा होईल व भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये महाराष्ट्रातील युवकांचा सहभाग देखील वाढेल.

### आयएएस आपल्या भेटीला या उपक्रमाची वैशिष्टये

१ महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेविषयी जागृती निर्माण करणे व भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे.

२. अत्यंत माफक दरात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेविषयी तज्ञ व अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.

आयएएस आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत समाविष्ठ होणारे अधिकारी
आय.ए.एस., आय.पी.एस, आय.आर.एस., एम.पी.एस.सी. अधिकारी,
व इतर शायकीय सेवा यांचा समावेश आहे. वर्षातून ५२ अधिकारी
व संबंधित विषयाचे अभ्यासक्रम उपलब्ध असणार आहेत.

## २. उद्योजक आपल्या भेटीला

महाविद्यालयातील युवकांचा उद्योग क्षेत्रातील सहभाग वाढावा, त्यांना व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक कौशल्यांचा विकास करण्यासाठी उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा अंतर्गत करण्यात आले आहे. जगभरातील उद्योग क्षेत्रातील चालू असणाऱ्या घडामोडी, देशांतर्गत व्यवसाय क्षेत्रात असणाऱ्या संधी, व्यवसाय सुरू करण्याची प्रक्रीया या संबंधीची माहिती अतिशय सोप्या पद्धतीने या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना दिली जाते. हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात राबविला जात आहे. महाविद्यालयांमध्ये अस्तित्वात असणाऱ्या उद्योजक विकास विभाग याच्याशी हा उपक्रम संलग्नीत करून सहज राबविता येणार आहे. या अंतर्गत विविध बँकांचे प्रतिनिधी, वेगवेगळ्या क्षेत्रातील यशस्वी उद्योजक, प्रशासकीय विभागाचे अधिकारी व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मातृभाषेमध्ये उपलब्ध करून दिले जात आहे. उद्योजक हे औद्यागिकरणाचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जातात. आज देशाला गरज आहे ती उद्योजकता विकासाची. उद्योजक हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला हातभार लावत असतात. उद्योजकाला योग्य असे नियोजन करावे लागते व कौशल्याचा आणि तंत्रज्ञानाचा वापर करून परिणामकारक रचना करावी लागते. या उपक्रमाद्वारे देशात उद्योजकता तयार होण्यासाठी उद्योजकीय संस्कार व उद्योजकीय प्रशिक्षण देऊन उद्योजक निर्माण करण्यासाठी उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत उद्योजक, बँकिंग अधिकारी, व्यावसायिक सल्लागार व शासकीय योजना यांचा समावेश आहे. वर्षातून ५२ उद्योजक व संबंधित विषयाचे अभ्यासक्रम उपलब्ध असणार आहेत.

| महिना | आयएएस आपल्या भेटीला (सायं. ६ ते ७) | उद्योजक आपल्या भेटीला (सायं. ७ ते ८) |
|---|---|---|
| मार्च<br>एप्रिल<br>मे | ✻ राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/महाराष्ट्र लोकसेवा आयोग<br>✻ पोलीस भरती | ✻ उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास |
| जून<br>जुलै<br>ऑगस्ट | ✻ बँकिंग सेवा | ✻ व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन |
| सप्टेंबर<br>ऑक्टोबर<br>नोव्हेंबर | ✻ स्टाफ सिलेक्शन कमिशन | ✻ वित्त व्यवस्थापन<br>✻ निर्णय क्षमता<br>✻ जोखीम व्यवस्थापन (Risk Management) |
| डिसेंबर<br>जानेवारी<br>फेब्रुवारी | ✻ केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु.पी.एस.सी.) | ✻ मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन<br>✻ आधुनिक तंत्रज्ञान |

(You Tube, Facebook live) सायंकाळी ०६ ते ७.३०

दर शनिवारी - प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत चर्चा

दर रविवारी - उद्योजकांसोबत चर्चा



यासोबत सभासद शुल्क रू.३६५/- भरल्यानंतर विद्यार्थ्यांना ३ वर्षे, प्रतिवर्षी ५ या पद्धतीने १५ कोर्स **मोफत** दिले जातील.

अधिक माहितीसाठी व कोर्सची यादी पाहणेसाठी https://careerkatta.mitsc.co.in या लिंक वर भेट द्यावी. संपर्क : 7507652555

## नविन शैक्षणिक धोरण आणि कोर्स
## करिअर कट्टा उपक्रमातील कोर्सची वैशिष्ट्ये

* कला, वाणिज्य, विज्ञान आदी शाखेतील विद्यार्थी या कोर्ससाठी पात्र असतील.
* महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातील तज्ञ मार्गदर्शक सर्व कोर्सच्या अंमलबजावणीत प्रमुख घटक असतील.
* कोर्स प्रमाणपत्र देण्यासोबतच गुणवत्ता पूर्ण शिक्षण व प्रशिक्षण देणे
* सर्व कोर्स online पद्धतीने राबविले जातील.
* महाविद्यालय प्रशासन व संसाधनांवरती येणारा अतिरिक्त ताण कमी करणे
* कोर्स महाविद्यालयीन वेळ वगळता राबविले जातील.
* महाविद्यालयात राबविण्यात येत असलेल्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला मदत करणे व आवश्यक तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे.
* कोर्स प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी किमान प्रवेश शुल्क आकारले जाईल.

## कोर्स राबविण्याच्या प्रमुख तीन पद्धती

| सध्या प्रवेशित / सहभागी विद्यार्थी | महाविद्यालय स्तरावरती कोर्स सुरू करण्यासंबंधी | MITSC द्वारे सुरू होणारा कोर्स |
|---|---|---|
| करिअर कट्टा उपक्रमाला जॉईन झालेले सर्व विद्यार्थी | ज्या महाविद्यालयांनी स्वत:चा कोर्स तयार केला आहे अशा महाविद्यालयांना करिअर कट्टा उपक्रमांतर्गत कोर्सच्या कमिटीची मान्यता घेणे अनिवार्य असेल | स्टँडर्ड कोर्स व प्रीमियम कोर्स अशा दोन प्रकारात कोर्सची विभागणी करण्यात आली आहे. स्टँडर्ड कोर्समध्ये करिअर कट्टा उपक्रमांतर्गत सुरू असणाऱ्या कोर्सचा समावेश आहे. तसेच प्रीमियम कोर्स मध्ये करिअर कट्टा उपक्रमांतर्गत सुरू होणाऱ्या कोर्स चा समावेश आहे. |

## करिअर कट्टा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कोर्सच्या संदर्भातील नियम

* करिअर कट्टा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कोर्सच्या संदर्भातील नियम हे कोर्स निवडणाऱ्या महाविद्यालयांना व विद्यार्थ्यांना लागू राहतील.
* दर महिन्याच्या १ तारखेला कोर्सची सुरवात होईल व महिन्याच्या शेवटच्या रविवारी परीक्षा घेण्यात येईल.
* दर सोमवारी दिड तासाचे सेशन असले व दर रविवारी सुट्टी असेल.
* कोर्सची परीक्षा देणे विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे.
* विद्यार्थ्यांनी विहित वेळेत परीक्षा दिली नाही तर त्यांना १० रू. परीक्षा फी भरून परीक्षा देता येईल व या १० रू. चा विनियोग करीअर कट्टा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या विकासासाठी करण्यात येईल.

## करिअर कट्टा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कोर्सचे नियम

* करिअर कट्टा अंतर्गत असणाऱ्या कोर्समध्ये बेसिक कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच ॲडव्हान्स कोर्स उपलब्ध राहिल.
* ज्या महाविद्यालयांनी स्वत:चा कोर्स तयार केला आहे अशा महाविद्यालयांना करिअर कट्टा उपक्रमांतर्गत कोर्सच्या कमिटीची मान्यता घेणे अनिवार्य असेल
* स्टँडर्ड कोर्स व प्रीमियम कोर्स अशा दोन प्रकारात कोर्सची विभागणी करण्यात आली आहे. स्टँडर्ड कोर्समध्ये करिअर कट्टा उपक्रमांतर्गत सुरू असणाऱ्या कोर्सचा समावेश आहे. तसेच प्रीमियम कोर्स मध्ये करिअर कट्टा उपक्रमांतर्गत नव्याने सुरू होणाऱ्या कोर्स चा समावेश आहे.

# Course List

1) Python Programming
2) Python for AI/ML
3) Python for Web Development
4) Cloud Computing
5) Devops
6) Data Analytics with Tableau and Power BI
7) Social Media Profile Management
8) Financial Literacy
9) Event Management
10) Fund Flow Management
11) Communication Skill & Personality Development
12) बी पी टी १९५० संस्था नोंदणी कायदा प्रशि क्षण
13) Road Safety and Awareness Training
14) परदेशी नोकरीच्या संधी आणि व्यक्तिमत्व विकास
15) Foundation Course in Business Law
16) माहिती अधिकार कायदा प्रशिक्षण
17) Soft Skill Training Program
18) Certificate Course in Human Right
19) Certificate Course in Journalism
20) Communication Skill Program
21) Content Writing Course
22) Basic of Cost & Works Accounting
23) E- Filling
24) Soft Skill Development
25) Introduction to Basic Concept of Accounting
26) Digital Banking
27) Digital Marketing
28) Political Ethics and Value
29) Leadership Development
30) Literacy about Judicial Process
31) Constitutional Values and Ethics
32) Certificate in Office Administration
33) Certificate in Training Management
34) Organic Farming
35) Fruits and Vegetables Drying Dehydration and Technology
36) Certificate course in World Politics
37) Certificate course in Rural Development
38) Scientific Temperament
39) Green Chemistry
40) Renewable Energy
41) Nanotechnology
42) Biotechnology
43) Medical Lab Technology
44) Nano Biotechnology
45) Introduction to Forensic Science
46) Tourism Management
47) Forensic Accounting
48) Cyber Law
49) Office Management
50) Consumer Protection Act 2019

युवा दिनानिमित्त युवकांसाठी जागतिक स्तरावरील संवाद कौशल्य वृद्धींगत करण्याचा उपक्रम १२ जानेवारी २०२२ रोजी आयोजित केला. युवा दिनाच्या कार्यक्रमामध्ये सन्माननीय शिक्षण मंत्री उदयजी सामंत यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगणे, त्याबरोबरच जागतिक स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील युवकांनी सक्षमपणे उभे राहिले पाहिजे, स्पर्धेला सामोरे गेले पाहिले आणि या उद्देशाने संवादासाठी महत्त्वांचं माध्यम असणारी जागतिक भाषा म्हणून इंग्रजी बोलण्याचे कौशल्य आत्मसात केले पाहिजे हा विचार व्यक्त केला. त्याचबरोबर पुढील युवादिनापर्यंत महाराष्ट्रातील १ लाख विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलण्याचे प्रशिक्षण देण्याचा संकल्प करण्याची इच्छा व्यक्त केली.

यानुसार महाराष्ट्रामध्ये एक लाख विद्यार्थ्यांना स्पोकन इंग्लिशचे प्रशिक्षण ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा हायब्रीड मॉडेलमध्ये उपलब्ध करून दिले जाणार आहे.

विभागीय स्तरावर व जिल्हास्तरावर टीचर ट्रेनिंग वर्कशॉप घेतले जातील. ऑनलाईन सॉफ्टवेअर ॲप्लिकेशनची सोय उपलब्ध करून दिली जाईल.

विद्यार्थ्यांच्या इंग्रजी बोलण्यामध्ये सातत्य रहावे यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जातील. महाराष्ट्रातील या उपक्रमामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम उपलब्ध करून दिला जाईल.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५९५१२,२६१३०१९७,२६१२४९१९ फॅक्स नं.०२०/२६१२११५३.
क्र.: शिआका/२५२१/प्र.क्र.२६/मवि-१/2105 दिनांक: १८.०२.२०२

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र
२. कुलसचिव, सर्व अकृषी./अभिमत/ स्वयं अर्थसाहीत विद्यापीठे/ महाराष्ट्र राज्य.

**विषय: राज्यातील शिक्षकांच्या आवाजाची काळजी घेणेबाबत कार्यशाळा आयोजित करणेबाबत.**

संदर्भ: अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांनी मा..मंत्री ,उच्च व तंत्रशिक्षण,विभाग,मंबई. यांना लिहीलेले पत्र क्र. मंत्री/उ व तं.शि/व्ही.आय.पी /१०७/२०२१, दिनांक-९/२/२०२१.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे.कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त पत्रान्वये उच्च शिक्षणातील सर्व शिक्षकांना आवाजाचा व्यावसायिक वापर ,त्याची काळजी कशी घ्यावी याबाबत ऑनलाईन कार्यशाळा घेण्याकरीता सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच त्यांची कार्यशाळा शिक्षकांसाठी अत्यंत उपयोगाची व उच्च व तंत्रशिक्षण विभागातील गुणवत्ता वाढीसाठी व शिक्षकांच्या आरोग्यासाठी अतिशय सकारात्मक परिणाम करणारी आहे, असेही नमूद केलेले आहे तरी सदर कार्यशाळा आयोजित करणेबाबत आपल्या अधिनस्त तसेच शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये यांना आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात व त्याबाबत अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.धनराज माने.)
शिक्षण संचालक,उच्च शिक्षण.
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रत-
१. स्वीय सहायक, मा.मंत्री,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तारभवन,मुंबई.४०० ०३२.
२. मा.प्रधान सचिव, ,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तारभवन,मुंबई-४०० ०३२.
३. अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र.

## ५ आवाजाची कार्यशाळा

आवाजाची काळजी घेण्यासाठी आणि आवाजाची पोत सुधारण्यासाठी त्याचबरोबर व्यावसायिकदृष्टया अधिकाधिक अचूकपणे आवाजाचा वापर करण्याची क्षमता प्रत्येक शिक्षकांच्यामध्ये असणे गरजेचे आहे आणि त्यासाठी आवश्यक आहे ते म्हणजे आवाजाचे शास्त्र समजून घेणे, आवाज निमार्ण कसा होतो हे जाणून घेणे त्याचप्रमाणे शरीरामध्ये दिर्घकालीन परिणाम करणारे काही आजार होत असताना आवाजाच्या माध्यमातून त्यांची चाहूल सगळ्यात आधी कशा रितीने लागू शकते हे जाणून घेणे. संवादाच्या या सगळ्यात महत्वाच्या माध्यमाची काळजी कशी घ्यावी हे प्रत्येक शिक्षकाला माहित असली पाहिजे. त्यामुळेच आम्ही घेऊन आलो आहोत आपल्यासाठी आपल्या सर्व युवा पिढी घडवणाऱ्या शिक्षकांच्यासाठी, प्राध्यापकांसाठी आणि या सर्व शिक्षण व्यवस्थेचे नेतृत्व करणाऱ्या पदाधिकाऱ्यांसाठी ''आवाजाची कार्यशाळा''!

सुप्रसिद्ध व्हॉईस थेरपिस्ट सोनाली लोहार या देशातील काही नामवंत ऑडिओलॉजीस्ट आणि स्पीच लॅग्वेज पॅथॉलॉजिस्ट पैकी एक आहेत. त्यांच असं स्वप्न आहे की, त्यांच्या या ज्ञानाचा उपयोग पिढी घडवणारे आणि पर्यायाने देशाचे भविष्य घडवणारे शिक्षक यांच्यासाठी झाला पाहिजे. शिक्षकांच्या आवाजाचे उत्तम स्वास्थ आणि आवाजामध्ये झालेली प्रगती ही विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन करण्याच्या प्रवासात अत्यंत उपयुक्त ठरेल असे त्यांना वाटते आणि म्हणूनच त्यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक प्राध्यापकांसाठी या आवाजाची कार्यशाळा ना नफा ना तोटा तत्त्वावर घ्यावयाचे योजिले आहे. व्यावसायिक तत्वावर ज्या कार्यशाळेसाठी २० ते २५ हजार रूपये खर्च येऊ शकतो, ती कार्यशाळा आज ''आवाज गुरूजनांचा वेध देशाच्या भवितव्याचा'' या उपक्रमांतर्गत केवळ रूपये १५३५/- (GST वगळता) मध्ये उपलब्ध होणार आहे, तरी याचा फायदा करून घ्यावा. त्यामुळे देशाच्या प्रगतीमध्ये अतिशय महत्वाचा वाटा असणाऱ्या सर्व गुरूजनांनी या कार्यशाळेमध्ये सहभागी व्हावे, ही विनंती.

SCAN ME

सहभागी होण्यासाठी QR कोड चा उपयोग करावा.



## मॉडेल कौशल्य विकास केंद्र

